# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक : - स्वरचित
- कवी / कवयित्रीचे नाव :-  सौ. अनल्पा अमित पेंडसे

विचार येता 'संगीत' विषयाचा
गुणगुणते मन "सा रे ग म प ध नी सा"
अगणित रागांची होते निर्मिती
गुंफण केवळ सात स्वरांची !
शुद्‌ध, कोमल, मंद्र, तीव्र
सुरांची किमया सांगावी किती !

सूरांना देता ताल-लयीचे लेणं
गुंफता शब्द साकारते गाणं
वाटतो तितका सोपा नाही हा प्रवास...
प्रतिभा कवीची अन ज्ञान संगीताचे
एकाग्रता एकलव्याची अन जाण कलेची
साधना सप्तसूरांची अन हवा संगीताचा ध्यास !

भक्ती, प्रेम, मोद, दुःख, विरह भाव हे सारे
हळुवार उमकती या मनीचे त्या मना रे
व्यक्त होण्या सहजसुंदर असेल संगीत साथीला
अभंग गाता गाता भक्त भेटतो त्या ईश्वराला
बरसते गगनातूनी वर्षा 'मल्हार' आळविताना
होतात प्रज्वलित दीप अनेक 'दीप' गाताना

झऱ्याची झुळझुळ-धबधब्याचे कोसळणे
पक्षांचा किलबिलाट-मोराचा केकारव
अल्हाददायी झुळुक वाऱ्याची-सोसाट्याचा वादळ वारा
फुला-पानांचे उमलणे-पतझड होऊन मातीत विलीन होणे
कोलाहल अंतरंगाचा करण्या शांत
अनुभवावे निसर्गाचे निःशब्द  संगीत

Anand Music Therapy

# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

सप्तसूर आणि सात चक्रे शरीराची
दोहोंचे जुळता धागे किल्ले गवसते आरोग्याची
स्वानंदासाठी गावे गाणे संगीतात रमून जावे
प्रसन्न सुंदर जगण्यासाठी 'संगीत' जीवनाचा भाग व्हावे
ठेवा भारतीय संगीताचा जतन करूया आपण सारे !

Anahat Music Therapy